# दिवाळखोरी आणि शोधन अक्षमता कोड, २०१६ (THE INSOLVENCY AND BANKRUPTCY CODE, 2016) – बुडत्याला काठीचा आधार !

भारतीय समाजव्यवस्थेत तथा भारतीय व्यवसायक्षेत्रात नातेसंबंध प्रस्थापित करणे तथा वृद्धिंगत करणे याला फार महत्व आहे. आपण भारतीय एक समाज म्हणून परस्पर विश्वासाच्या आधारावर व्यवसाय करण्यात अजूनही विश्वास राखून आहोत. मात्र, निर्माणाधीन अवस्थेतून जात असणाऱ्या आपल्या देशाला इतर कुठल्याही विकसनशील देशाप्रमाणे भेडसावणाऱ्या प्रमुख समस्यांपैकी एक म्हणजे अनेक छोट्या व मोठ्या कंपन्यांची स्वीकृत अथवा अस्वीकृत दिवाळखोरी. अगदी सोप्या शब्दात सांगायचे म्हणजे, बँकाकडून तथा बिगरबँकिंग वित्तीय संस्थांकडून (NON BANKING FINANCIAL INSTITUTIONS) घेतलेल्या ऋणाची परतफेड करण्याची तसेच अनेकविध व्यावसायिक व्यवहारातून घेतलेल्या सेवा, वस्तूंचा तथा मालाचा मोबदला देण्याची स्वीकृत अथवा अस्वीकृत अक्षमता म्हणजेच कंपन्यांची आर्थिक दिवाळखोरी.

दिवाळखोरी आणि शोधन अक्षमता कोड, २०१६ अस्तित्वात येण्याआधी कर्ज तथा पैसे थकविलेल्या कंपन्यांकडून कायदेशीररित्या पैसे वसूल करण्याची तसेच दिवाळखोरी जाहीर करण्याची प्रक्रिया अतिशय गुंतागुंतीची, क्लिष्ट, वेळखाऊ आणि सरफेसी कायदा २००२, रुग्ण औदयोगिक कंपनी (विशेष प्रावधान) अधिनियम १९८५, कंपनी कायदा १९५६ यामध्ये विवादित व विभाजित होती. मात्र, दिवाळखोरी आणि शोधन अक्षमता कोड, २०१६ कार्यान्वित झाल्यानंतर हीच प्रक्रिया अतिशय सुलभ, ग्राहकांभिमुख, समयनियोजीत आणि काटेकोर झालेली आहे.

जेट ऐअरवेस, आय एल अँड एफ एस आणि रिलायन्स कम्युनिकेशन इत्यादींसारख्या मोठ्या व प्रसिद्ध कंपन्या दिवाळखोरीच्या प्रक्रियेतून जात असल्या कारणाने दिवाळखोरी आणि शोधन अक्षमता कोड, २०१६ सर्वसामान्यांच्या घराघरात पोहोचला आहे. तसे असून देखील दिवाळखोरी आणि शोधन अक्षमता कोड, २०१६ म्हणजे नक्की काय हे माहित नसणाऱ्यां व्यावसायिकांची संख्याही लक्षणीय आहे. म्हणूनच, आधुनिक व्यावसायीक युगातील शक्तिशाली अस्त्र असलेल्या दिवाळखोरी आणि शोधन अक्षमता कोड, २०१६ याची तोंडओळख करून देण्यासाठी केलेला हा लेखन प्रपंच.

आधी सांगितल्याप्रमाणे कंपन्यांच्या दिवाळखोरीसंबंधित खटले पद्धतशीरपणे सोडविण्यासाठी आणि सदर प्रक्रिया सोपी, सुलभ व समयसूचक करण्याच्या दृष्टीने दिनांक २८ मे २०१६ रोजी दिवाळखोरी आणि शोधन अक्षमता कोड, २०१६ अधिनियमित करण्यात आले. तसेच, दिवाळखोरी आणि शोधन अक्षमता कोड, २०१६ चा अतिमहत्वाच्या घटक असलेली कॉर्पोरेट दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया (CORPORATE INSOLVENCY RESOLUTION PROCESS) दिनांक १ डिसेंबर २०१६ पासून अधिनियमित करण्यात आली. कंपन्यांची तसेच मर्यादित दायित्व भागीदारीसंबंधीची (LIMITED LAIBILITY

PARTNERSHIPS) दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया दिनांक १ डिसेंबर २०१६ पासून अधिनियमित झालेली असून वयक्तिक तथा नोंदणीकृत तथा अनोंदणीकृत भागीदारी व्यवसायांची दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया अजूनही अधिनियमित करण्यात आलेली नाही.

दिवाळखोरी आणि शोधन अक्षमता कोड, २०१६ अंतर्गत दाखल होणारे सर्व खटले राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (NATIONAL COMPANY LAW TRIBUNAL) यांच्या अखत्यारीत वर्ग करण्यात आलेले असून राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण हे दिवाळखोरी निराकरण प्रक्रियेसंबंधीची प्रकरणे हाताळणारे एकमात्र अधिकृत प्राधिकरण आहे. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाची खंडपीठे मुंबई, दिल्ली, कोलकाता, चेन्नई, अहमदाबाद, अलाहाबाद, बंगळुरू, कटक, चंडीगड, गुवाहाटी, हैद्राबाद व जयपूर येथे स्थित असून अपिलीय खंडपीठ नवी दिल्ली येथे स्थित आहे. देशभरातील दिवाळखोरी आणि शोधन अक्षमता कोड, २०१६ खाली दाखल झालेली प्रकरणे कंपन्यांच्या नोंदणीकृत कार्यालयांच्या अनुषंगाने भारतभर असणाऱ्या खंडपीठाच्या प्रादेशिक कार्यक्षेत्रात विभागण्याचे आणि वर्ग करण्यात येण्याचे प्रावधान आहे. तसेच, भारतीय दिवाळखोरी आणि शोधन अक्षमता बोर्ड (INSOLVENCY AND BANKRUPTCY BOARD OF INDIA) ही दिवाळखोरी आणि शोधन अक्षमता कोड, २०१६ याखाली स्थापन झालेली नियमन संस्था असून कॉर्पोरेट दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया, दिवाळखोरी निराकरण व्यावसायिक, दिवाळखोरी प्रक्रियेत गुंतलेल्या इतर व्यायवसयिक संस्था याचे प्रशासन व नियमन करण्याचे काम करते.

कुठल्याही कंपनीचे आर्थिक देयदार (बँका, बिगर बँकिंग वित्तीय संस्था, परस्पर कर्ज दिलेल्या इतर कंपन्या इत्यादी) (FINANCIAL CREDITORS) तथा कायद्याच्या अथवा कराराच्या आधारावर झालेले कंपनीचे देयदार (कंपनीला कराराच्या, कर चलनाच्या तसेच भारतीय करार कायदा १८७२ च्या आधारावर दिलेल्या वस्तू , सेवा तसेच मालाचा मोबदला न मिळाल्यामुळे कायदेशीररित्या झालेले कंपनीचे देयदार) (OPERATIONAL CREDITOR) थकीत रक्कम रुपये एक लाख किंवा अधिक असल्यास सदर कंपनीविरुद्ध कॉर्पोरेट दिवाळखोरी निराकरण प्रक्रियेसंबंधीची याचिका राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांच्या लागू खंडपीठात दाखल करू शकतात. महत्वाची बाब म्हणजे स्वतः कॉर्पोरेट कर्जदार (रक्कम / मोबदला थकवलेली कंपनी) वेळ मर्यादेत कर्जाची परतफेड अथवा घेतलेल्या सेवांचा, वस्तूंचा आणि मालाचा मोबदला देण्यात अकार्यक्षम आणि अपयशी ठरल्यास राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांच्याकडे कॉर्पोरेट दिवाळखोरी निराकरण प्रक्रियेसाठी याचिका दाखल करू शकतात.

राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण याचिका दाखल झाल्यानंतर सुनावणीद्वारे कॉर्पोरेट कर्जदार आणि याचिकाकर्ता देयदार यांची बाजू ऐकून घेऊन तथ्य आणि सादरीकरणाच्या आधारावर सदरची याचिका मान्य करू शकते अथवा नाकारू शकते. सदर याचिका मान्य होण्याचा कालावधीमध्ये कॉर्पोरेट कर्जदाराने थकीत रक्कम चुकती केल्यास अथवा सहसंमतीने याचिकाकर्ता देयदारासोबत संमती अटी आणि शर्ती मान्य केल्यास आणि तसे राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणासमोर प्रतिज्ञापत्राद्वारे सादर केल्यास राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण याचिका त्वरित निकाली काढू शकते.

राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण याचिका दाखल झाल्यानंतर सुनावणीद्वारे कॉर्पोरेट कर्जदार आणि याचिकाकर्ता देयदार यांची बाजू ऐकून घेऊन तथ्य आणि सादरीकरणाच्या आधारावर सदरची याचिका मान्य करू शकतात अथवा नाकारू शकतात. सदर याचिका मान्य होण्याचा कालावधीमध्ये कॉर्पोरेट कर्जदाराने थकीत रक्कम चुकती केल्यास अथवा सहसंमतीने याचिकाकर्ता देयदारासोबत संमती अटी आणि शर्ती (CONSENT TERMS) मान्य केल्यास आणि तसे राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणासमोर प्रतिज्ञापत्राद्वारे सादर केल्यास राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण याचिका त्वरित निकाली काढू शकते. याचिकाकर्ता देयादाराची याचिका मान्य झाल्यास राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण अंतरिम दिवाळखोरी निराकरण व्यावसायिकाची (INTERIM RESOLUTION PROFESSIONAL) नियुक्ती कॉर्पोरेट कर्जदार कंपनीवर करते. सदर अंतरिम दिवाळखोरी निराकरण व्यावसायिकाची नियुक्ती कॉर्पोरेट कर्जदार कंपनीवर झाल्यानंतर कंपनीच्या संचालकांना असलेले सर्व अधिकार अंतरिम दिवाळखोरी निराकरण व्यावसायिकाला प्राप्त होतात व कंपनीचे संचालक केवळ नाममात्र राहतात. अंतरिम दिवाळखोरी निराकरण व्यावसायिकाची नियुक्ती कमाल ३० दिवसांसाठी करता येते. कॉर्पोरेट कर्जदार कंपनीचे दैनंदिन कामकाज पाहणे, कंपनीच्या सर्व देयादारांकडून कॉर्पोरेट कर्जदार कंपनीकडून असलेल्या थकबाकीचे दावे एकत्रित करणे, कंपनीच्या आर्थिक देयदारांची मिळून एक समिती गठन करणे आणि कंपनीच्या आर्थिक देयदारांची समितीची पहिली बैठक बोलावणे ही अंतरिम दिवाळखोरी निराकरण व्यावसायिकाची प्रमुख कार्ये आहेत. कॉर्पोरेट कर्जदार कंपनीच्या आर्थिक देयदारांच्या समितीच्या पहिल्या बैठकीत अंतरिम दिवाळखोरी निराकरण व्यावसायिकाचे दिवाळखोरी निराकरण व्यावसायिक (RESOLUTION PROFESSIONAL) म्हणून नियमन करणे अथवा इतर कुठल्या दिवाळखोरी निराकरण व्यावसायिकाचे नाव नियुक्तीसाठी राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाला सूचित करणे ही कार्ये प्रामुख्याने पार पाडली जातात.

आर्थिक देयदारांच्या समितीने दिवाळखोरी निराकरण व्यावसायिकाची नियुक्ती केल्यानंतर दिवाळखोरी निराकरण व्यावसायिक कॉर्पोरेट कर्जदार कंपनीच्या दिवाळखोरी निराकरण प्रक्रियेविषयीचे माहिती पत्रक (INFORMATION MEMORANDUM) प्रसिद्ध करून सदर कॉर्पोरेट कर्जदार कंपनीसाठी दिवाळखोरी निराकरण योजनेसाठीचे (RESOLUTION PLAN) अर्ज मागवतो. एकापेक्षा अधिक अर्ज आले दिवाळखोरी निराकरण अर्जदारांकडून (RESOLUTION APPLICANT) आले असल्यास कंपनीसाठी अधिक फायदेशीर योजनेची निवड राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण करू शकते.

राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाकडे दिवाळखोरी निराकरणासाठी याचिका आल्यावर आणि सदरची याचिका मान्य झाल्यावर दिवाळखोरी निराकरण अर्जदाराने केलेल्या दिवाळखोरी निराकरण योजनेला संमती देऊन त्याची अंमलबजावणी करणे अथवा कॉर्पोरेट कर्जदार कंपनीच्या दिवाळखोरीचे निराकरण शक्य नसल्याच्या निष्कर्षाप्रती पोहोचल्यावर सदर कॉर्पोरेट कर्जदार कंपनीच्या मालमत्ता विघटित करून सर्व देयदारांची देणी त्यांच्या दाव्यांच्या प्रमाणात देऊन कंपनी विसर्जित करणे या पैकी एका पर्यायाचा अवलंब केला जातो. सदरची दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया अथवा कंपनीच्या मालमत्ता विघटित करून कंपनी विसर्जित करण्याची प्रक्रिया १८० दिवसात पूर्ण करण्याचे प्रावधान दिवाळखोरी आणि शोधन अक्षमता

कोड, २०१६ यामध्ये आहे. गरज पडल्यास ९० दिवसांचा अतिरिक्त वेळ सदरची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी दिला जाऊ शकतो.

सदरची दिवाळखोरी निराकरण सुरु प्रक्रिया असताना राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण अधिस्थगन कालावधी (MORATORIUM) जाहीर करते. सदर कालावधीमध्ये कंपनीवर अथवा कंपनीच्या मालमत्तेवर कोणीही कुठल्याही प्रकारची टाच आणू शकत नाही.

आर्थिक दिवाळखोरीमुळे स्वतःसकट आपल्या देयदारांना आणि कर्जदारांना घेऊन बुडणाऱ्या कंपन्यांचा गाडा रुळावर आणण्यासाठी, आणि अतिशय खोलवर दिवाळखोरीत रुतलेल्या कंपनीच्या देयदारांना कंपनीच्या मालमत्तेचे विघटन करून कमी जास्त प्रमाणात का होईना पण विभागून लागू देय रक्कम देण्याचे प्रावधान असलेले दिवाळखोरी आणि शोधन अक्षमता कोड, २०१६ हे 'बुडत्याला काठीचा आधार' या शीर्षकाला समर्पकरीत्या पात्र ठरते.

लेखाचा शेवट करताना प्रथम परिचछेदामध्ये केलेल्या व्यायवसायिक नातेसंबंद वृद्धिंगत करण्याच्या आणि परस्पर विश्वासाच्या जोरावर व्यायसाय करण्याचा भारतीय मानसिकतेवर टिप्पणी करावीशी वाटते. व्यावसायिक जीवनात कार्यरत असताना केवळ विश्वास आणि नातेसंबंधीच्या जोरावर फोनवर खरेदी ऑर्डर देणारे व घेणारे, वेळेवर चलन अथवा बिल खरीददाराला न देणारे, आपण केलेल्या कामाची लिखित पोचपावती न घेणारे, आपल्या थकबाकीचा कोर्टात स्वीकार्य असलेल्या ई-मेल आणि पत्राद्वारे पाठपुरावा ना करता व्हाट्सअँपवर अथवा फोनवर पाठपुरावा करणारे आणि इतर कंपन्यांना सक्ख्याच्या आधारावर कुठल्याही कागदपत्रांची पूर्तता व उपलब्द्ध कायद्याच्या चौकटीबाहेर जाऊन कर्ज देणारे अनेकजण भेटतात. मात्र, इथे नमूद केलेल्या आणि तत्सम व्यवसाय पद्धतींचे अनुसरण करणाऱ्या लोकांची आपला दावा सिद्ध करताना तारांबळ उडते आणि अधिकतम प्रकरणांमध्ये कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे थकबाकीचा दावा मान्य होत नाही.

म्हणूनच आजच्या गतिशील आणि जोखमीच्या व्यावसायिक युगात प्रत्येत व्यावसायिकाने व्यवसाय करताना विश्वासाचाअंधविश्वास न होऊ देता सजगतेने व्यवसाय केल्यास व्यावसायिक स्पर्धेमध्ये टिकण्यास, वृद्धिंगत होण्यास आणि महत्वाचे म्हणजे कोणाकडूनही सहजासहजी फसवणूक न होण्यास मदतच होईल यात शंका नाही.

निनाद सहस्रबुद्धे
कंपनी सचिव
ई-मेल – NINADSAHASRABUDDHE@HOTMAIL.COM